**॥ॐ श्री साईनाथाय नमः॥**

# वंदनीय श्री सद्‌गुरुनाथ दादा (भागवत)

**कृपास्थापित**

## ‘दादर कार्यकेंद्र’

## श्री शारदीय नवरात्रपूजन विधी (पत्रक)

**( दिनांक ०७ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर २०२१ )**

**सूचना : बुधवार दि. ०६ ऑक्टोबर २०२१** (अधिक अश्विन अमावास्या) रोजी मांडलेले अनुष्ठान हलवून.
**गुरुवार दि. ०७ ऑक्टोबर २०२१**(निज आश्विन शुध्द प्रतिपदा) या दिवशी नवरात्रीचे अनुष्ठान मांडावे.

---

*** गुरुवार दि. ०७ ऑक्टोबर २०२१ (निज आश्विन शुध्द प्रतिपदेपासून) ते शुक्रवार दि. १५ ऑक्टोबर २०२१ (निज आश्विन शुध्द दशमीपर्यंत) हा ‘नवरात्रपूजन विधी’ खालीलप्रमाणे करावा.**

**साहित्य :**

नित्यपूजन विधी साहित्य+ गोमूत्र (किंवा हळद-कुंकू घातलेले पाणी), रांगोळी, पाट, अक्षता, पंचामृत, कोमट पाणी, विडा १ (२ पाने व १ सुपारी), रु. २१/-, एक श्रीफळ, एक फळ, एक वाटी गूळ-खोबरे आणि रु. २५/- (अष्टमीसाठी), आंब्याच्या पानांचे तोरण व आंब्याची डहाळी.

**पूजनविधी :**

१) • सर्वप्रथम एका भांड्यात पाणी घेऊन त्यात गोमूत्र किंवा हळद-कुंकू घालावे. हे पाणी आंब्याच्या किंवा विड्याच्या तीन पानांनी घरात सर्वत्र शिंपडावे.
• दरवाज्यावर आंब्याच्या पानांचे तोरण बांधून मधोमध आंब्याची डहाळी लावावी.
तसेच, दरवाजाबाहेर उंबरठ्यावर रांगोळी काढावी.

२) खालील प्रार्थना करून पूजन विधीस प्रारंभ करावा.
**प्रार्थना : ‘गुरुआज्ञेने मी, माझ्या कुटुंबातील कुलधर्म भावी काळासाठी निश्चित केला असून जी सेवा माझ्या हातून घडेल, ती आपण सर्व देवदेवतांनी मान्य करून घ्यावी.’**

३) घरातील इतर देवांच्या पूजेची प्राथमिक तयारी करावी.(फोटो पुसणे, गंध लावणे, फुले वाहणे, इ.)

४) • पूजनाची जागा गोमूत्र किंवा पंचामृताने शुद्ध करून घ्यावी.
• हळद-कुंकवाचे स्वस्तिक 卐 काढून त्यावर पाट मांडावा.
• पाटाभोवती रांगोळी काढून त्यावर हळद-कुंकवाचे पृथ्वीतत्त्व ✡ काढावे व त्यावर ताम्हन ठेवावे.
• ताम्हनामध्ये अक्षता घालून त्यावर हळद-कुंकवाचे पृथ्वीतत्त्व ✡ काढावे.

५) • गुरुकृपेने प्राप्त झालेल्या श्रीसाईशक, श्रीकारण, श्रीमहाकारण व श्रीनारायणी या प्रतिमांना पंचामृत व त्यानंतर कोमट पाण्याने स्नान घालावे व त्या स्वच्छ पुसून घ्याव्यात.
• त्यांपैकी श्रीसाईशक, श्रीकारण व श्रीमहाकारण या प्रतिमा डबीत घालून, ती डबी झाकण न लावता, अक्षतांवर काढलेल्या पृथ्वीतत्त्वावर, ताम्हनात ठेवावी. तसेच, श्रीनारायणी प्रतिमाही आसनासहित त्या डबीशेजारी, ताम्हनाच ठेवावी.
• अनुष्ठानासमोर एक श्रीफळ, रु.२१/-चा विडा, दक्षिणा, गूळ खोबरे, एक फळ, ठेवावे.
विडा व श्रीफळावर हळद-कुंकू वाहावे.
• फूलास गंध-हळद-कुंकू लावून ती प्रतिमांवर वाहावीत.
• नंतर उदबत्ती, साजूक तुपाचे निरांजन व दूध-साखरेचा नैवेद्य दाखवून पूजन करावे.

६) • कमीतकमी एक आरती म्हणावी. ‘त्यानंतर **मंगलाचरण** (सजयति) म्हणावे. **श्रीशक्तिपीठ प्रार्थना** म्हणावी.’ एकवीस वेळा **महामंत्र** (सर्व मंगल मांगल्ये) म्हणावा. **एकवीस वेळा तारकमंत्र** (ॐ श्री सदगुरूनाथ दादाय नम:) म्हणावा. शेवटी **‘दैनंदिन प्रार्थना’** म्हणावी.

७) • सायंकाळीही उदबत्ती, साजूक तुपाचे निरांजन व दूध-साखरेचा नैवेद्य दाखवून पूजन करावे व किमान एक आरती म्हणावी.

• सकाळी काढून ठेवलेले गूळ-खोबरे (श्रीफळ नव्हे) व फळ प्रसाद म्हणून त्या दिवशी घरात घ्यावे.

८) • नवमीपर्यंत वरील अनुष्ठानात मांडलेल्या प्रतिमा जागच्या हलवू नयेत.

• दररोज सकाळी प्रतिमांवरील आदल्या दिवशीची फुले (निर्माल्य) बाजूला काढावी. दुसऱ्या एका फुलाने प्रतिमांवर पाणी सिंचन करावे व दुसऱ्या फुलांना गंध-हळद-कुंकू लावून ती फुले प्रतिमांवर वाहावीत.

• त्यानंतर उदबत्ती, निरांजन, दूध-साखरेचा नैवेद्य व किमान एक आरती, असे पूजन दररोज करावे. तसेच, सायंकाळीही उदबत्ती, निरांजन, दूध-साखरेचा नैवेद्य दाखवून पूजन करावे व किमान एक आरती म्हणावी.

**९) शुद्ध अष्टमीच्या दिवशी : (बुधवार दि. १३ ऑक्टोबर २०२१)**

• सकाळी वरीलप्रमाणे पूजनानंतर ब्राह्मण सुवासिनी भोजन, ओटी, इ. प्रीत्यर्थ **रु. ५०/-** अनुष्ठानासमोर काढून ठेवावेत व खालील प्रार्थना म्हणावी. **''श्रीगुरुआज्ञेने, जो कुलधर्म - कुलाचार आम्ही कुटुंबात करीत होतो किंवा करणे क्रमप्राप्त होते व तत्प्रीत्यर्थ जी रक्कम आम्ही खर्च केली असती, ती न करता, आम्ही कुटुंबीय, आता गुरुमार्गी झाल्यामुळे, ह्या रकमेचा विनियोग, सत्कारणी करण्याचे, निश्चित केले आहे. तरी आपण सर्व देवदेवतांनी, ही सेवा मान्य करून, मला व माझ्या कुटुंबीयांना, कृपाशीर्वाद द्यावा.''**

१०) **शुद्ध नवमीच्या दिवशी : (गुरुवार दि. १४ ऑक्टोबर २०२१)**

• सकाळी प्रतिमा जाग्यावरून हलवाव्यात. त्यांना पंचामृत व कोमट पाण्याने स्नान घालावे व पुसून पुन्हा पाटावरील ताम्हनात पूर्ववत ठेवाव्यात व त्यांना गंध, हळद- कुंकू-फुले वाहावीत. त्यानंतर उदबत्ती, निरांजन, दूध-साखरेचा नैवेद्य व किमान एक आरती, असे पूजन करावे.

• सायंकाळी उदबत्ती, निरांजन, दूध-साखरेचा नैवेद्य दाखवून पूजन करावे व किमान एक आरती म्हणावी.

११) **विजयादशमीच्या दिवशी : (शुक्रवार दि. १५ ऑक्टोबर २०२१)**

• पहिल्या आठ दिवसांप्रमाणेच सकाळी सर्व देवांचे व प्रतिमांचे पूजन करावे. तसेच गुरुप्रसाद आत्मनिवेदन, इत्यादी ग्रंथ, मुलाखतीची वही, पेन हे अनुष्ठानासमोर पूजनास ठेवावे.

• त्यानंतर उदबत्ती, निरांजन, दूध-साखरेचा नैवेद्य व किमान एक आरती असे पूजन करावे.

• त्या दिवशी घरातील वापरात असलेली यंत्रे (मोटर, स्कूटर, टी.व्ही., फ्रीज इ.) यांचे फूल, गंध-हळद-कुंकू, उदबत्ती, निरांजन यांनी पूजन करावे.

• सायंकाळी उदबत्ती, निरांजन, दूध-साखरेचा नैवेद्य दाखवून पूजन करावे व किमान एक आरती म्हणावी.

• विजयादशमीपासून **'श्री साईशक ४०'** व्यवहारात आणावा.

**१२) विजयादशमीच्या दुसऱ्या दिवशी : (शनिवार दि. १६ ऑक्टोबर २०२१)**

• अनुष्ठान हलवावे व प्रतिमा धुऊन-पुसून पूर्ववत देवाऱ्यात पूजनात ठेवाव्यात.

• प्रथम दिवशी ठेवलेला नारळ व ताम्हनातील अक्षता प्रसाद म्हणून घरात वापरात घ्याव्यात.

• **रु.२१/-**चा विडा कार्यकेंद्रावर नेऊन **प.पू. बाबांचे चरणी** तबकात अर्पण करावा व अष्टमीच्या दिवशी काढलेले **रु.५०/-** कार्यकेंद्रावरील **'अल्पबचत निधीत'** दादर कार्यकेंद्रावर येऊन अथवा ऑनलाईन जमा करावेत.

**सूचना :** ज्यांच्याकडे प्रतिमा नसतील त्यांनाही नवरात्रपूजन विधी वरीलप्रमाणे करता येईल. फक्त प्रतिमांचे अनुष्ठान व त्याप्रीत्यर्थचे सर्व औपचार करू नयेत.

**॥ शुभं भवतु ॥**